| | | | |
|---|---|---|---|
| Published Date: | 1 Apr 2023 | Publication: | Sakal (Marathi) [Mumbai] |
| Journalist: | Vasant Kulkarni | Page No: | 40 |
| Circulation: | 118,764 | | |




मीता शेट्टी

# भारतासाठी मध्यम ते दीर्घकालीन दृष्टिकोन सकारात्मक

टाटा ॲसेट मॅनेजमेंट कंपनीमध्ये निधी व्यवस्थापिका असलेल्या मीता शेट्टी यांनी भारतीय भांडवली बाजार, आयटी आणि फार्मा क्षेत्राबाबत भाष्य करताना, गुंतवणूकदारांनी सद्यःस्थितीत काय केले पाहिजे,
1 यावर आपले मत व्यक्त केले. ज्येष्ठ गुंतवणूक सल्लागार वसंत कुलकर्णी यांनी 'सकाळ मनी'साठी घेतलेली त्यांची खास मुलाखत.

मीता शेट्टी या टाटा ॲसेट मॅनेजमेंट कंपनीमध्ये निधी व्यवस्थापिका आहेत. मीता शेट्टी या अर्थशास्त्रात पदवीधर आहेत. त्या अमेरिकेतील सीएफए इन्स्टिट्यूटपात्रताधारक आहेत. गुंतवणूक व्यवस्थापनाचा त्यांना १६ वर्षांचा समृद्ध अनुभव आहे. टाटा ॲसेट मॅनेजमेंट कंपनीत दाखल होण्यापूर्वी त्यांनी कोटक सिक्युरिटीज, एचडीएफसी सिक्युरिटीज, एशियन मार्केट सिक्युरिटीज आणि दलाल आणि भरुचा स्टॉक ब्रोकिंग आणि कार्व्ही स्टॉक ब्रोकिंगमध्ये समभाग विश्लेषक म्हणून काम केले आहे.

**प्रश्न : आर्थिक वर्ष २०२३-२०२४ साठी भांडवली बाजाराकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत?**

**शेट्टी :** सरलेल्या कॅलेंडर वर्षात भारत जगभरातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या बाजारांपैकी एक बाजार होता. भारतीय निर्देशांक त्याच्या सार्वकालिक उच्चांकावर होता, तर उर्वरित जगात आणि विशेषतः विकसित देशांच्या बाजारपेठांमध्ये मोठी घसरण झालेली दिसली. मात्र, नव्या कॅलेंडर वर्षात बाजारांचा कल उलटा झालेला दिसत आहे. जागतिक बाजारांमध्ये तेजीचे संकेत मिळत आहेत, तर भारतीय बाजारांमध्ये अस्थिरता वाढली असून भारतीय बाजार मोठ्या घसरणींना सामोरे गेल्याचे दिसत आहे. निफ्टी निर्देशांक मागील महिन्यांत पाच टक्क्यांच्या जवळपास घसरला आहे. बाजार ऐतिहासिक सरासरीच्या उच्चांकी पातळीवर असला तरी अनेक कंपन्यांच्या अधिमूल्यात घसरण झाल्यामुळे अशा कंपन्या ज्या मागील वर्षी महाग होत्या, त्यांचे मूल्यांकन वाजवी झाले आहे. या पार्श्वभूमीवर आम्हाला बँका, इन्फ्रा, उत्पादन आणि भांडवली वस्तू क्षेत्रांकडून आम्हाला अपेक्षा आहे. बँकांच्या कर्ज वितरणातील वाढ ही मागील दहा वर्षांच्या उच्चांकी पातळीवर आहे. रिझर्व्ह बँकेने जाहीर केलेल्या जानेवारीच्या बँकिंग आकडेवारीनुसार, कर्ज वितरणवाढीचा दर १६.७ होता. गेल्या काही वर्षांच्या संथ वाढीनंतर खासगी क्षेत्राकडून भांडवली गुंतवणूक वाढण्याची अपेक्षा आहे. गेल्या काही वर्षांपासून सरकारी भांडवलनिर्मितीला खासगी क्षेत्राकडून चालना मिळेल. नव्या आर्थिक वर्षासाठी भांडवली खर्चासाठी अर्थसंकल्पीय तरतूद ३५ टक्क्यांहून वाढली आहे, ज्यामुळे पायाभूत सुविधा आणि भांडवली वस्तूंवर भर देण्यात आला आहे. 'चायना प्लस वन' विचारधारेचा भारताला नक्कीच फायदा होईल. जागतिक अर्थव्यवस्थांमध्ये त्यांच्या उत्पादनक्षमता अंशतः भारतात हलवण्यासाठी व्यापक स्तरावरील विचार सुरू असून, 'पीएलआय'मुळे खासगी भांडवली खर्चात येत्या वर्षात आणखी वाढ होईल. बाजारातील सर्वव्यापी तेजी येण्यात ग्रामीण बाजारपेठेचा मोठा वाटा असतो.

शहरी बाजारपेठेत मागणी काहीशी मंदावलेली दिसत आहे. हे नजीकच्या काळात असले तरी, मध्यम ते दीर्घकालीन दृष्टिकोन सकारात्मकता आहे. भारत ही जगातील सर्वांत वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे. अर्थसंकल्पी तूट आणि परकी चलनाचा साठा यासारखे व्यापक आर्थिक निर्देशक सकारात्मक आहेत. तथापि, व्याजदरात वाढ; तसेच वाढलेली महागाई यामुळे काही उद्योग क्षेत्रात मंदीची शक्यता दिसत आहे. जागतिक मंदीचाही काही उद्योग क्षेत्रांवर थोड्याफार प्रमाणात परिणाम होण्याची शक्यता आहे. अलीकडील काळातील घसरण जमेस धरली तरी बाजाराचे मूल्यांकन अजूनही ऐतिहासिक सरासरीपेक्षा जास्त असल्याने लगेच तेजीची शक्यता नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| Published Date: | 1 Apr 2023 | Publication: | Sakal (Marathi) [Mumbai] |
| Journalist: | Vasant Kulkarni | Page No: | 41 |
| Circulation: | 118,764 | | |





**प्रश्न : तुम्ही टाटा डिजिटल इंडिया फंड, टाटा इंडिया फार्मा आणि हेल्थकेअर या फंडांचे व्यवस्थापन करत आहात. आयटी आणि फार्मा क्षेत्राबाबतचा तुमचा दृष्टिकोन काय आहे?**

**शेट्टी :** गेल्या दोन वर्षांमध्ये, जागतिक आयटी सेवा क्षेत्रामध्ये डिजिटलायझेशनमुळे मोठी गुंतवणूक क्लाउडसारख्या मंचाशी संबंधित गोष्टींवर झाली. कारण कोरोनादरम्यान सर्वच व्हर्टिकल आणि सर्वच भौगोलिक क्षेत्रांमधील कंपन्यांमध्ये वेगाने या बदलाचा अवलंब केला गेला. याचा एक सेवाप्रदाता असल्याचा भारतातील माहिती तंत्रज्ञान क्षेत्राला फायदा झाला. कोविडपूर्व काळात माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा वृद्धिदर ७ ते ८ टक्के होता. कोरोनादरम्यान माहिती तंत्रज्ञान क्षेत्राचा वृद्धिदर जवळजवळ दुप्पट झाला. याच दरम्यान एका वर्षाचा फॉरवर्ड पीई सरासरी २० वरून ३५ वर गेला. यापुढेही, आयटी सेवा उद्योगाचा वृद्धिदर कोविडपूर्व कालावधीच्या तुलनेत अधिक राहण्याची शक्यता आहे. उद्योग संस्थांच्या; तसेच नॅस्कॉम, गार्टनर आदींसारख्या संशोधन संस्थांच्या अपेक्षाही वाढीबाबत आशावादी आहेत; कारण त्यांना या वेगवान तंत्रज्ञानावर होणारा खर्च पुढील दोन वर्षे सुरू राहण्याची अपेक्षा आहे. तथापि, कंपन्यांच्या टेक बजेटवर जागतिक मंदी आणि महागाईचा संभाव्य परिणाम नाकारता येत नाही. कारण टेक बजेट हे उद्योगांच्या महसूलवाढीशी निगडित असते. परंतु, हा धोका अल्प कालावधीसाठी असण्याची आम्हाला शक्यता वाटते. तंत्रज्ञान हे सतत बदलत असल्याने त्यावर खर्च करणे कंपन्यांना भाग पडते. येत्या काही वर्षांत जग अधिक डिजिटल होताना दिसत आहे. या बदलाचा भारतीय आयटी क्षेत्राला फायदा होत असल्याचे दिसत आहे. तथापि, आम्ही जागतिक समष्टी अर्थशास्त्रामुळे काही प्रकल्प लांबणीवर पडू शकतात किंवा प्रकल्पांबाबतचे निर्णय घेण्यास विलंब होऊ शकतो. मागील दोन वर्षांत कंपन्यांनी माहिती तंत्रज्ञानावर केलेल्या मोठ्या खर्चाच्या तुलनेत पुढील काही महिन्यांत मंदीसदृश परिस्थिती असण्याची शक्यता वाटते. ग्राहकांना माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात सायबर सुरक्षा, डेटा आणि विश्लेषणाची वाढती गरज असल्याने सातत्याने सुधारणा करत राहण्याची गरज असते. म्हणून भविष्यात गुंतवणूकदार या क्षेत्राकडून १०-१२ टक्के परताव्याची अपेक्षा करू शकतात.

दुसरीकडे फार्मा क्षेत्र हे गेल्या आठ वर्षांपासून नफ्याचा अभाव राहिलेले क्षेत्र आहे. जून २०१५ पासून या क्षेत्राने जवळपास शून्य परतावा दिला आहे, तर यूएस जेनेरिक मार्केटमधील किमतीतील स्पर्धा हे या क्षेत्रासमोरच्या चिंतेचे कारण आहे. बहुतांश भारतीय फार्मा कंपन्यांच्या महसुलाच्या जवळपास ३३ टक्के हिस्सा हा अमेरिकेच्या जेनेरिक औषधांचा आहे. यूएस जेनेरिक औषधांच्या किमतींमध्ये तीव्र घट झाल्यामुळे भारतीय फार्मा कंपन्यांची नफाक्षमता कमी झाली आहे. त्याचा परिणाम या क्षेत्राच्या मूल्यांकनावर झाला असून, या क्षेत्रातील कंपन्या एक वर्षाच्या २० फॉरवर्ड पीईवर आहेत. याच कंपन्यांचे मूल्यांकन २०१५ मध्ये ३० पीई दरम्यान होते. अनेक कंपन्या अमेरिकेच्या बाजारातून बाहेर पडण्याचा विचार करताना दिसत आहेत. ज्या कंपन्यांचे देशांतर्गत बाजारपेठेवर वर्चस्व आहे, अशा कंपन्यांच्या मूल्यांकनात सुधारण होत असल्याने फार्मा क्षेत्राला नजिकच्या काळात गती मिळण्याची शक्यता आहे.

**प्रश्न : अलीकडेच टाटा डिजिटल इंडिया फंडाची कामगिरी बेंचमार्कच्या खाली होती. खालावलेल्या कामगिरीचे कारण काय आहे?**

**शेट्टी :** आयटी क्षेत्रासाठी मागील एक वर्ष जागतिक मंदीच्या भीतीने ग्रासलेले होते. वाढलेल्या महागाईमुळे आयटी क्षेत्रातील कंपन्यांचे ग्राहक त्यांच्या आयटी खर्चाच्या तरतुदीमध्ये कपात करतील, अशी भीती आयटी कंपन्यांना आणि पर्यायाने गुंतवणूकदारांना वाटत आहे. याचा परिणाम आयटी निफ्टी निर्देशांकातील तीव्र घसरणीतदेखील दिसून आला आहे. निर्देशांकात मागील वर्षभरात १५ टक्क्यांची घसरण झालेली दिसली. मागील वर्षभरात सर्वांत वाईट कामगिरी क्षेत्रीय निर्देशांक (सेक्टोरल इंडेक्स) आयटी निफ्टी ठरला आहे. आमच्या फंडात, कोरोनाकाळात अमेरिकेवर अवलंबून असलेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक होती. कोरोनापश्चात अमेरिकेवर अवलंबून नसलेल्या कंपन्यांमध्ये गुंतवणुकीचे संक्रमण केले आहे. आमच्या फंडातील १२ टक्के कंपन्या अशा होत्या, ज्या डिजिटल स्वरूपाच्या आहेत; परंतु शुद्ध आयटी क्षेत्रातील नाहीत. मध्यम ते दीर्घ कालावधीसाठी, आमची रणनीती 'कंपाउंडर्स' आणि निर्देशांकापेक्षा अधिक वृद्धीदर असलेल्या; परंतु वाजवी मूल्यांकन असलेल्या आणि ज्या अल्फानिर्मिती करू शकतील, अशा कंपन्यांचा समावेश करण्याची आहे. कंपन्यांच्या निवडीसाठी आमची एक विशिष्ट विचारधारा असून, 'वाजवी मूल्यात वाढ' या आमच्या मूळ कल्पनेवर आधारित आहे, ज्यामध्ये आम्ही अशा कंपन्यांमध्ये गुंतवणूक करण्याचा विचार करतो; ज्या केवळ वाढीची शक्यताच देत नाहीत, तर भविष्यात अशा कंपन्यांचे 'री-रेटिंग' होण्याची शक्यता आहे.

**प्रश्न : ज्या गुंतवणूकदारांनी एक-दीड वर्षापूर्वी परताव्याच्या मोहाने गुंतवणूक केली आणि सध्या या गुंतवणुका तोट्यात आहेत, अशा गुंतवणूकदारांच्या समुदायासाठी तुम्ही काय संदेश द्याल?**

**शेट्टी :** बँकिंग, मॅन्युफॅक्चरिंग, इन्फ्रा यासारख्या क्षेत्रांतील कंपन्यांचे मूल्यांकन नव्याने गुंतवणूक करण्यासाठी आकर्षक पातळीवर आहे. म्हणूनच दीर्घकालीन गुंतवणूक करू इच्छिणाऱ्यांनी सद्यःस्थितीत गुंतवणूक करायला हवी. परंतु, बाजार मूल्यांकन वाजवी पातळीवर असल्याने, अल्पकाळासाठी गुंतवणुकीत तोटा दिसू शकेल. जागतिक आर्थिक मंदी आणि चलनवाढ आणि भारतातील नजिकच्या काळातील संभाव्य मंदीची चिंतादेखील अस्थिरता वाढवू शकते. म्हणून, सध्याच्या अस्थिरतेच्या काळात एकरकमी गुंतवणूक करण्यापेक्षा एसआयपी/एसटीपी पद्धतीने गुंतवणूक करावी. मालमत्ता विभाजन गुंतवणूकदाराच्या जोखीमांकानुसार करावे. लार्ज/मिड/स्मॉल कॅप फंडांना गुंतवणुकीत योग्य वाटा द्यावा. बॅलन्स्ड ॲडव्हांटेज फंड देखील इक्विटीतील अस्थिरता चांगल्या प्रकारे हाताळू शकतात. लार्ज आणि मिड कॅप, फोकस्ड फंडासारखे फंड मध्यम ते दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकदारांना सध्याच्या मूल्यांकनामुळे संधी उपलब्ध झाली आहे. क्षेत्रीय फंड हे उच्च जोखीम घेणाऱ्या गुंतवणूकदारांसाठी असतात. असे गुंतवणूकदार बँकिंग, इन्फ्रा तसेच आयटी फंडांमध्ये गुंतवणूक करू शकतात.

₹




Display: 3/3